# STI - मुख्य परीक्षा - 2015
## पेपर 1
## मराठी व इंग्रजी

1. **खाली दिलेल्या चार वाक्यातून व्याकरणिक दृष्ट्या अयोग्य असलेल्या वाक्याचा पर्याय लिहा :**
(1) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द नामे किंवा विशेषणे असतात.
(2) अव्ययीभाव समास असलेला शब्द क्रियाविशेषण असतो.
(3) बहुव्रीही असलेला शब्द विशेषण असतो.
(4) एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येत नाही.

2. **विरुद्ध अर्थी जोड्या ओळखा.**
(अ) कृपा × अवकृपा (ब) कृत्रिम × नैसर्गिक
(क) कृपण × उदार (ड) प्रसरण × अप्रसरण
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ), (ब) व (ड) बरोबर, (क) चूक
(2) (ब), (क) व (ड) बरोबर, (अ) चूक
(3) (अ), (ब) व (क) बरोबर, (ड) चूक
(4) सर्व बरोबर

3. **पुढील विधाने पहा.**
(अ) नामाच्या तीन प्रकारांपैकी फक्त सामान्य नामाचेच अनेकवचन होते.
(ब) विशेषनाम हे एकाच व्यक्तीचे नाव असल्यामुळे त्याचे अनेक वचन होत नाही.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) बरोबर, (ब) चूक
(2) (अ) चूक, (ब) बरोबर
(3) दोन्ही चूक
(4) दोन्ही बरोबर

4. **पुढील विधाने वाचा.**
(अ) मराठीतील तत्सम इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्द ऱ्हस्वान्त लिहावेत.
(ब) तत्सम क्रियाविशेषणे दीर्घान्त लिहावेत.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) चूक
(2) फक्त (ब) चूक
(3) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर
(4) (अ) आणि (ब) दोन्ही चूक.

5. **'तेजोनिधी' या शब्दाची संधी खालीलपैकी कोणत्या पोटशब्दांनी केली जाते?**
(1) तेज + निधी (2) तेजो + निधी
(3) तेजः + निधी (4) तेजः + नीधी

6. **कमीत कमी शब्दात सामासिक शब्दाचे केलेले स्पष्टीकरण म्हणजे ..... होय.**
(1) दूराग्रह (2) विग्रह
(3) आग्रह (4) परग्रह

7. **'जा, ये, कर, बस, बोल, पी' यासारख्या मराठी भाषेतील मूळ धातूंना ...... म्हणतात.**
(1) साधित शब्द (2) सिद्ध शब्द
(3) देशी शब्द (4) तत्सम शब्द

8. **योग्य जोड्या जुळवा.**
(अ) पाणउतारा करणे (i) दमछाक होणे
(ब) पायरीने राहणे (ii) अपमान करणे
(क) नाकी नऊ येणे (iii) योग्यतेप्रमाणे राहणे
**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (iii) | (i) |
| (3) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (i) | (i) | (ii) |

9. **विभक्तीप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागून तयार झालेल्या नामाच्या रूपाला म्हणतात :**
(1) साधित शब्द (2) संयुक्त व्यंजन
(3) सामान्यरूप (4) संधी

10. **पुढील विधाने वाचा.**
(अ) विशेषण ही विकारी शब्दजाती आहे; तथापि काही विशेषणे विशेष्याच्या लिंगवचनानुसार बदलत नाहीत.
(ब) नामापूर्वी येणाऱ्या विशेषणाला विधीविशेषण, तर नामानंतर येणाऱ्या विशेषणाला अधिविशेषण म्हणतात.
(क) वाक्यात नाम नसते तेव्हा विशेषणही नसते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (अ) व (क) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) फक्त (ब) व (क) बरोबर

The UNIQUE academy

**11. खालीलपैकी कठोर व्यंजने कोणती?**

(अ) च (ब) फ

(क) द (ड) थ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब) (2) फक्त (ब), (क)

(3) फक्त (क), (ड) (4) फक्त (ब), (ड)

**12. 'सर्व बाजूंनी संकट येणे' हा अर्थ नसलेले वाक्प्रचार कोणते?**

(अ) आकाशाची कुऱ्हाड होणे.

(ब) आभाळ फाटणे.

(क) आभाळ भरून येणे.

(ड) आभाळ दिसणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब) बरोबर

(2) फक्त (क), (ड) बरोबर

(3) फक्त (अ), (क) बरोबर

(4) फक्त (अ), (क), (ड) बरोबर

**13. 'चहा करणे' या वाक्प्रचाराचा पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार विरुद्धार्थी आहे?**

(1) कोंडमारा होणे (2) खडे फोडणे

(3) काखा वर करणे (4) कणिक तिंबणे

**14. व्यंजनसंधी म्हणजे......**

(1) एकत्र येणाऱ्या दोन वर्णांपैकी एक स्वर व दुसरा व्यंजन जोडणे.

(2) एकमेकाशेजारी येणारे दोन स्वर जोडले जाणे.

(3) एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन जोडला जाणे.

(4) एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण स्वर जोडला जाणे.

**15. 'पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता' या वाक्याचा प्रकार निवडा.**

(1) स्वार्थी वाक्य (2) आज्ञार्थी वाक्य

(3) विध्यर्थी वाक्य (4) संकेतार्थी वाक्य

**16. 'धर्मराज हा पहिला पांडव होता' वाक्यातील उद्देश्य ओळखा.**

(अ) पहिला (ब) पांडव

(क) धर्मराज (ड) हा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) आणि (क) बरोबर, बाकी सर्व चूक

(2) फक्त (ब) बरोबर, बाकी सर्व चूक

(3) फक्त (ड) बरोबर

(4) फक्त (क) बरोबर, बाकी चूक

**17. सामान्यनामे व विशेषनामे यांना 'आई', 'ई', 'की', 'गिरी', 'ता', 'त्व', 'पण', 'पणा', 'य', 'व' – या सारखे प्रत्यय लावून ........ नामे तयार करता येतात.**

(1) भाववाचक (2) समुदायवाचक

(3) धर्मिवाचक (4) काल्पनिक

**18. बरोबर की चूक.**

(अ) मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपान्त्य इकार किंवा उकार ह्रस्व लिहावा.

(ब) अ–कारान्तापूर्वीचे इकार किंवा उकार ह्रस्व लिहितात

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) बरोबर (2) केवळ (ब) बरोबर

(3) (अ) आणि (ब) बरोबर (4) (अ) आणि (ब) चूक

**19. 'मी उशीरा उठतो ते बाबांना आवडत नाही' दोन केवल वाक्यांचे वाक्य संकलन करा.**

(अ) मी उशीरा उठतो म्हणून बाबांना आवडत नाही.

(ब) माझी उशिरा उठण्याची वृत्ती बाबांना मुळीच आवडत नाही.

(क) माझ्या बाबांना उशिरा उठणे आवडत नाही.

(ड) माझे उशिरा उठणे माझ्या बाबांना आवडत नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ड) चूक, बाकी सर्व बरोबर

(2) फक्त (ड) बरोबर, बाकी सर्व चूक

(3) फक्त (अ) आणि (ब) बरोबर, बाकी सर्व चूक

(4) फक्त (क) आणि (ड) बरोबर, बाकी सर्व चूक

**20. जोड शब्द नसलेला पर्याय ओळखा.**

(अ) टेबलखुर्ची (ब) अदलाबदल

(क) सल्लामसलत (ड) सोनेचांदी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) बरोबर, बाकी चूक

(2) (ब) व (क) बरोबर, बाकी चूक

(3) (क) व (ड) बरोबर, बाकी चूक

(4) (अ) व (ड) बरोबर, बाकी चूक

**21. 'राजेशने मनिषावर जिवापाड प्रेम केल्याचे नाटक करून तिच्याशी लग्न केले. लग्नानंतर काही महिन्यातच गोड बोलून तिची सारी संपत्ती आपल्या नावावर केली. एके रात्री राजेश दारु पिऊन घरी आला. तिच्याशी भांड–भांड भांडला. तिच्यावर नाही नाही ते आरोप केले आणि तिचा खून केला' – या घटनेसाठी खाली दिलेल्या वाक्प्रचारातून योग्य वाक्प्रचाराची निवड करून त्याचा पर्याय लिहा :**

(1) काट्याने काटा काढणे (2) कंठस्नान घालणे

(3) केसाने गळा कापणे (4) कुंपणाने शेत खाणे

22. **'दक्षिण समुद्राजवळच्या सेतुपासून हिमालयापर्यंत' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द सांगा :**

(1) समुद्रमंथन (2) परिक्रमा

(3) आसेतुहिमाचल (4) हिमसरोवर

23. **जोड्या जुळवा.**

(अ) अव्ययीभाव समास (i) गर्भश्रीमंत

(ब) पंचमी तत्पुरुष समास (ii) मानधन

(क) मध्यमपदलोपी समास (iii) दिवसेंदिवस

(ड) बहुव्रीही समास (iv) साखरभात

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (ii) | (i) | (ii) | (iv) |

24. **'त्याला पहिला वर्ग मिळावा म्हणून तो खूप अभ्यास करतो आहे' या वाक्याचा प्रकार ओळखा.**

(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य

(3) आज्ञार्थी वाक्य (4) संयुक्त वाक्य

25. **'विध्वंसक' या शब्दाचा विरोधार्थी आशय व्यक्त करणारा शब्द ओळखा.**

(अ) पुरोगामी (ब) विधायक

(क) मवाळ (ड) सुलक्षणी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) व (ड) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर

(3) फक्त (क) बरोबर (4) फक्त (अ) बरोबर

26. **'धर्म करता कर्म उभे राहते' या म्हणीचा योग्य अर्थ ओळखा.**

(1) धर्माचे पालन करताना कर्म करावे लागले.

(2) दानधर्म केला तर पुण्य मिळते.

(3) धर्मपालन केल्यावर कर्मबंधनातून मुक्ती मिळते.

(4) एखाद्याला साह्य करायला गेल्यास भलतेच संकट मागे लागते.

27. **वाक्यात दर्शविलेल्या क्रियेला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असणाऱ्या नामपदबंधास काय म्हणतात?**

(1) कर्ता (2) कर्म

(3) क्रियापद (4) कर्मपूरक

28. **'ताजमहल' शारदीय पौर्णिमेत अधिकच देखणा दिसतो. या वाक्यातील विधेयविस्तार कोणते?**

(अ) ताजमहल

(ब) शारदीय पौर्णिमेत

(क) अधिकच देखणा

(ड) दिसतो पर्यायी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ड) बरोबर, बाकी सर्व चूक

(2) फक्त (क) बरोबर, बाकी सर्व चूक

(3) फक्त (ब) बरोबर, बाकी सर्व चूक

(4) (ब), (क) बरोबर, बाकी सर्व वूक

29. **खालील वाक्यातील प्रयोग अनुक्रमे ओळखा.**

(अ) शिक्षक मुलांना शिकवतात.

(ब) रामाच्याने काम करवते.

(i) कर्तरी-कर्तरी (ii) कर्मणी-कर्मणी

(iii) कर्तरी कर्मणी (iv) कर्मणी-कर्तरी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (i) बरोबर (2) फक्त (iii) बरोबर

(3) फक्त (iv) बरोबर (4) फक्त (ii) बरोबर

30. **जी उपवाक्ये 'अथवा', 'किंवा' या अव्ययांनी जोडलेली असतात, तेव्हा त्या वाक्यांना काय म्हणतात?**

(1) विकल्प बोधक (2) समुच्चय बोधक

(3) न्यूनत्व बोधक (4) परिणाम बोधक

31. **'या आधुनिक लोकशाहीच्या युगात समाजाने जागृत होऊन आपला योग्य तो मार्ग निवडणे गरजेचे आहे' – व्याकरणिकदृष्ट्या या वाक्याचा प्रकार सांगा :**

(1) केवल वाक्य (2) मिश्रवाक्य

(3) संयुक्त वाक्य (4) संकेतार्थी वाक्य

32. **वाक्यार्थाला बाधा न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे:**

(1) वाक्य रूपांतर (2) वाक्य पृथक्करण

(3) वाक्य संकलन (4) संयुक्त वाक्य

33. **'प्रतिकार, पडजीभ, दरमजल, हरवक्त' – हे शब्द मराठी व्याकरणात ....... ओळखले जातात.**

(1) उपसर्ग साधित शब्द (2) प्रत्यय साधित शब्द

(3) अभ्यस्त शब्द (4) अनुकरणवाचक शब्द

34. **पुढील विधाने वाचा.**

(अ) ईकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप याकारान्त होते.

(ब) ऊ-कारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप वाकारान्त होते.

(क) ओकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ओकारान्तच राहते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (ब) व (क) बरोबर

(3) फक्त (अ) बरोबर (4) सर्व बरोबर

35. **लेखन नियमानुसार शुद्ध शब्द ओळखा.**

(1) अभिष्ठचिंतन (2) अभिष्टचिंतन

(3) अभीष्टचिंतन (4) अभीश्टचिंतन

**36. मराठी भाषे संदर्भातील पुढील कोणते वाक्य अयोग्य आहे?**

(1) 'मराठी असे आमुची मायबोली' असे प्रत्येक मराठी भाषिकाने अभिमानाने म्हटले पाहिजे.

(2) मराठी महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे.

(3) हिंदी ही मराठी भाषेची जननी आहे.

(4) आज मराठी भाषेच्या लेखनासाठी देवनागरी लिपीचा वापर होतो.

---

**37. 'अरविंद, जलज, राजीव, पद्म' या शब्दांना समानार्थी शब्द कोणता?**

(1) अमृत (2) गुलाब (3) कमळ (4) चंद्रिका

---

**38. पुढे दिलेल्या जोड्या जुळवा.**

| अव्यय | | शब्द |
|---|---|---|
| (अ) शोकदर्शक | (i) | शाब्बास, वाहवा |
| (ब) प्रशंसादर्शक | (ii) | अ ब ब, बापरे, अरेच्या |
| (क) संमतीदर्शक | (iii) | अरे रे, अगाई, आई ग |
| (ड) आश्चर्यदर्शक | (iv) | हां, जी, |

**ठीक उत्तरासाठी योग्य ते पर्याय निवडा :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (i) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

---

**39. पुढीलपैकी कोणत्या विभक्तीला अनेक वचनासाठी प्रत्यय आहे परंतु एकवचनास प्रत्यय नाही?**

(1) प्रथमा (2) तृतीया

(3) संबोधन (4) सप्तमी

---

**40. 'रामाने पुस्तकावर नाव घातले' या वाक्यातील आधारपूरक कोणते?**

(1) रामाने (2) पुस्तकावर

(3) नाव (4) पुस्तकावर नाव

---

**41. पुढील विधाने वाचा.**

(अ) च, ही, ना, फक्त ही शुद्ध शब्दयोगी अव्यये आहेत

(ब) काही शब्दयोगी अव्यये विभक्तीप्रत्ययांचे कार्य करतात.

(क) शब्दयोगी अव्यय जोडले जाताना मूळ शब्दांचे सामान्यरूप होत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर

(2) फक्त (ब) व (क) बरोबर

(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर

(4) फक्त (अ) व (क) बरोबर

---

**42. भावकर्तृक क्रियापद असलेल्या वाक्याचा पर्याय लिहा :**

(1) पित्त झाल्यामुळे प्रमोदला आज मळमळते आहे.

(2) सुज्ञास अधिक सांगणे न लगे।

(3) आम्ही काही पुस्तके पुण्याहून मागविली.

(4) बाळू, एवढे काम कर बरं!

---

**43. पुढील विधाने वाचा.**

(अ) अलका आणि सुनील विजूच्या घरी गेले. – हे संयुक्त वाक्य आहे.

(ब) संयुक्त वाक्यात दोन वा अधिक स्वतंत्र वाक्ये जोडलेली असतात.

(क) संयुक्त वाक्यात प्रधानत्व बोधक उभयान्वयी अव्यये वापरली जातात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) चूक

(2) फक्त (अ) व (ब) चूक

(3) फक्त (अ) व (क) चूक

(4) फक्त (ब) व (क) चूक

---

**44. 'तो नेहमीच उशिरा येतो' या वाक्याचा काळ ओळखा.**

(1) रीति वर्तमानकाळ (2) संनिहित भविष्यकाळ

(3) रीति भविष्यकाळ (4) संनिहित वर्तमानकाळ

---

**45. वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.**

**'डोळ्यांवर कातडे ओढणे'**

(1) डोळ्यावर चामड्याची पट्टी बांधणे

(3) जाणूनबुजून दुर्लक्ष करणे

(2) डोळे मिटून घेणे

(4) लक्ष देऊन पाहणे

---

**46. 'आकांक्षाने सुरेल गीत म्हटले'.**

**या वाक्यात 'सुरेल' हे ....... आहे.**

(1) विधेय (2) विधेय पूरक

(3) विधेय विस्तार (4) कर्म विस्तार

---

**47. पुढील वाक्यातील न्यूनत्वबोधक अव्यय ओळखा.**

**'मरावे परी कीर्तिरूपे उरावे'**

(1) उरावे (2) कीर्तिरूपे

(3) परी (4) मरावे

---

**48. खाली दिलेल्या समूहदर्शक शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| अ–गट | | ब – गट |
|---|---|---|
| (अ) मडके | (i) | संघ |
| (ब) खेळाडू | (ii) | चळत |
| (क) विद्यार्थी | (ii) | उतरंड |
| (ड) नाणी | (iv) | गट |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (i) |

**49. खालीलपैकी संकेतार्थ वाक्य कोणते?**

(अ) जर उद्या सुट्टी मिळाली तर तुझ्या घरी येईन.

(ब) उद्या सुट्टी मिळाल्यावर तुझ्या घरी येईन.

(क) तुझ्या घरी येण्यास सुट्टी हवी.

(ड) सुट्टी मिळाल्यानंतर तुझ्या घरी येईन.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर, बाकी सर्व चूक

(2) (अ), (ब) बरोबर, (क), (ड) चूक

(3) (ब), (क) बरोबर, बाकी सर्व चूक

(4) फक्त (ड) बरोबर, बाकी सर्व चूक

**50. 'माझे गाव मला फार आवडते' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग ओळखा.**

(1) पुल्लिंगी (2) नपुसकलिंगी

(3) स्त्रीलिंगी (4) यापैकी नाही

**51. वाक्समूहासाठी योग्य वाक्प्रचार ओळखा. 'नारायण हा खूप गुंड वृत्तीचा, व्यसनी आणि साऱ्या गावात बदनाम माणूस होता. मात्र त्याचा मुलगा हा सदाचारी, प्रेमळ व गुणी होता.'**

(1) कर्णाचा अवतार (2) गावमामा असणे

(3) भांगेत तुळस असणे (4) महादेवापुढचा असणे

**52. मराठीत प्रमुख सर्वनामे किती?**

(1) सात (2) नऊ

(3) दहा (4) आठ

**53. मूळ शब्दाच्या मागे, पूर्वी एक वा अधिक अक्षरे जोडतात त्यांना ......... म्हणतात.**

(1) सिद्ध शब्द (2) साधित शब्द

(3) उपसर्ग (4) प्रत्ययघटित शब्द

**54. खाली दिलेल्या पर्यायातून अकर्मक धातू असलेल्या शब्दांचा पर्याय लिहा :**

(1) सळसळ, खळखळ, थरथर, कूडकूड

(2) नासका, सडका, कुजका, खराब

(3) हुशार, चलाख, तरबेज, पारंगत

(4) मोडले, उघडले, तोडले, बांधले

**55. खालीलपैकी अचूक विधाने कोणती?**

(अ) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.

(ब) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप होत नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (ब) चूक

(2) (अ) चूक (ब) बरोबर

(3) दोन्ही चूक

(4) दोन्ही बरोबर

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 56 ते 60 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

प्रा. कार्व्हर यांनी आपल्या पहिल्याच दिवसाच्या अध्यापनाची सुरुवात करताना आपल्या विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितलं –

जो निसर्गाच्या प्रेमात पडून त्याच्याशी जवळीक साधतो त्याच्याशीच निसर्ग गुजगोष्टी करतो. युवकांनो, सृष्टी काय शिकवते इकडे उघड्या डोळ्यांनी, उघड्या कानांनी लक्ष द्या; म्हणजे आयुष्यात प्रत्येक दिवशी तुमच्या ज्ञानात अमूल्य माहितीची भरच पडेल. निसर्गाशी तादात्म्य पावल्याखेरीज त्याची रहस्यं कळत नसतात. तुम्ही बँकेत किती माया जमविली आहे, तुम्ही पोषाख कसा करता हे तुमच्या यशाचं गमक मानू नका. तुम्ही समाजाची किती व कशी सेवा करू शकता यावर तुमच्या आयुष्याची सार्थकता अवलंबून आहे. मग साऱ्या वर्गावर आपली हसरी नजर फिरवून ते पुढे म्हणाले, ''चला! वर्गाबाहेर पडा. आजवर कोणीच केला नसेल असा एक नवा उपक्रम हाती घ्यायचा आहे. आपल्याला आता गावात फिरून प्रत्येक अंगणात, परसात टाकून दिलेला भंगारमाल गोळा करायचा आहे. फुटकी भांडी-कुंडी, दिवट्या-चिमण्या, बाटल्या, डबे, अगदी जे मिळेल ते जमा करायचं आहे. आपल्याला एक प्रयोगशाळा उभारायची आहे आणि त्यासाठी ही अशी उपकरणं जमवावी लागतात,'' असं म्हणून त्यांनी आपल्या पेटीतून आणलेली छोटी-छोटी उपकरणं विद्यार्थ्यांना दाखवली.

प्राध्यापक आणि विद्यार्थी 'प्रयोगशाळेची उपकरणं' गोळा करण्याच्या मोहिमेवर निघाले. ती मुलखावेगळी कामगिरी साऱ्यांच्या अंगात संचारली होती. संध्याकाळी सगळे परतले. सारा गाव गोळा करून मुलं परतली होती. प्रा. कार्व्हरनी प्रत्येकाची पाठ थोपटली. ते त्यांना म्हणाले, ''तुम्ही आणलंत त्यातलं काहीच टाकाऊ नाही. काही आत्ता उपयोगी पडणार आहे तर काही नंतर.''

आजही 'टस्कीगी' तील 'कार्व्हर म्युझियम' पाहाल तर काय दिसेल? ज्या टाकाऊ वस्तूंचा वापर करून लाबॅमाची उभारणी करण्याच्या आपल्या कार्याला प्रा. कार्व्हरनी सुरुवात केली, त्यांचा संग्रह आजही तिथे जतन करून ठेवलेला आहे. जुना रॉकेलचा दिवा. चकचकीत घासलेला. त्याची काच काजळीने काळी कुळकुळीत केलेली. त्या काचेवर एक बारीकसं वर्तुळ जाणीवपूर्वक स्वच्छ, पारदर्शक ठेवलेलं. मायक्रोस्कोपवर त्यातल्या त्यात प्रखर उजेड घेण्याची ही सोय. शाईच्या दौतीचा उपयोग बुनसेन बर्नर म्हणून. चहाकपाचा उपयोग खल म्हणून, तर खुंटाळ्याच्या खुंटीचा उपयोग बत्त्यासारखा कुटण्यासाठी. फळांच्या रिकाम्या, स्वच्छ डब्यांत

The Unique academy

निरनिराळी रसायनं लेबलं लावून ठेवलेली. फुटक्या बाटल्या जळत्या दोरीच्या साह्याने व्यवस्थित कापून त्यांचे पेले बनवलेले. पत्र्यांचे तुकडे व्यवस्थित कापून त्यावर निरनिराळ्या मापांच्या खिळ्यांनी भोकं पाडून त्यांच्या माती चाळण्यासाठी चाळण्या केलेल्या.

त्यांची ही प्रयोगशाळेची उभारणी त्यांचे विद्यार्थी पाहत होते. त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. प्रा. कार्व्हर यांच्या हाताखाली शिकून बाहेर पडलेले विद्यार्थी जिथे जिथे समाजसेवा करण्यासाठी, विशेषत: शेतीसुधारणेच्या कामी गेले, तिथे तिथे त्यांनी साधनांच्या अभावाचा कधीच बाऊ केला नाही. केवळ महागडी व अत्याधुनिक साधनं वापरून यश मिळवता येतं असं नाही, हे त्यांना पुरतेपणी अनुभवाला आलं होतं. 'सर्वसामान्य गोष्टीचं यश असामान्य कसं ठरेल ते पाहा. ज्या कशामुळे आपल्या (बांधवांच्या) थाळ्या अन्नाने भरतील ते महत्त्वाचं समजा'. आपल्या शिक्षकाचा हा संदेश ते कधीच विसरले नाहीत.

**56. मायक्रोस्कोपवर प्रखर उजेड घेण्यासाठी कार्व्हरनी कशाचा वापर केला?**

(1) शाईची दौत (2) चहाचा कप
(3) रॉकेलचा दिवा (4) फुटक्या बाटल्या

**57. टाकाऊ वस्तूंपासून उभारलेल्या प्रयोगशाळेतून कार्व्हर यांनी कोणता संदेश दिला?**

(अ) समाजाची सेवा करून यश मिळवता येते.
(ब) प्रयोगशाळेची उभारणी करून यश मिळवता येते.
(क) निसर्गाशी एकरूप होणे गरजेचे आहे.
(ड) सामान्य गोष्टीतूनही असामान्य यश मिळविता येते

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ब) व (ड) बरोबर
(2) फक्त (अ) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) फक्त (ड) बरोबर

**58. प्रा. कार्व्हर यांच्या मते जीवनाची सार्थकता कोणत्या गोष्टीत दडलेली आहे?**

(1) प्रयोगशाळा उभारणीत
(2) समाजाच्या सेवेत
(3) टाकाऊतून टिकाऊ बनविण्यात
(4) असामान्य यश मिळविण्यात

**59. प्रस्तुत उताऱ्याची मध्यवर्ती कल्पना ओळखा.**

(1) टाकाऊतून टिकाऊ (2) यशाचे मार्ग
(3) निसर्ग प्रेम (4) समाज सेवा

**60. प्रा. कार्व्हर यांच्या प्रयोगशाळेचे अंतिम साध्य कोणते आहे?**

(अ) आपल्या बांधवांची भूक भागविणे
(ब) सुसज्ज प्रयोगशाळा उभारणे
(क) टाकाऊतून टिकाऊ बनविणे
(ड) निसर्गाशी एकरूप होणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) फक्त (अ) बरोबर
(3) (अ) व (ड) बरोबर
(4) फक्त (क) बरोबर

**61. Choose the correct sentence.**

(1) The jury were divided in its opinions.
(2) The Secretary and Treasurer is negligent of his duty.
(3) Every soldier and every sailor were in his place.
(4) Either the manager or his assistants failed in his duty.

**62. Which one of the following lines uses capitalisation correctly ?**

(1) If winter comes, can spring be far behinds ?
(2) If Winter comes, can Spring be far behind ?
(3) If winter comes, can Spring be far behind ?
(4) If Winter comes, can spring be far behind ?

**63. Which of the alternatives would be equivalent to the following sentence ?**

**I am as strong as he.**

(1) He is stronger than I.
(2) He is not stronger than I.
(3) He is so strong as I am not.
(4) None of the above

**64. Choose the best meaning of the word in capitals in the following sentence.**
**They might do the job if you DANGLE a bonus in front of them.**

(1) To parcel objects
(2) To praise in appreciation
(3) To reduce as a punishment
(4) To offer as an attraction

**65. 'In addition to useful advice, he gave me financial help.'**
**Which one of the following sentences converts the simple sentence above into a compound sentence by using cumulative conjunction?**

(1) He gave me financial help and added to useful advice.
(2) He not only gave me useful advice but financial help also.
(3) He gave me not only useful advice but financial help also.
(4) He not only gave me financial help but also useful advice.

**66. Choose the correct sentence/s :**
(a) Which is your friend ?
(b) Which are your books?
(c) Which will you take ?
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

**67. Choose the correct expression out of the alternatives :**
(1) Bury the hatchet
(2) Bury the hatch
(3) Bury under the hatchet
(4) Bury over the hatch

**68. 'Her bank fell down from her purse.'**
**The underlined word 'bank' in the sentence above means**
(1) side of a river (2) row of keys
(3) financial institution (4) balance

**69. Choose clause/s of time from the given sentences.**
(a) I will do it when I think fit.
(b) They can stay where they are.
(c) As he came into the room all rose to their feet.
**Answer options :**
(1) (a) only (2) (a) and (b) only
(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

**70. Which of the following sentences uses subjunctive mood to express a purpose?**
(a) Work hard that you may succeed.
(b) Work hard to succeed.
(c) Work hard with a purpose to succeed.
(d) Work hard purposefully to succeed.
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) (c) only (4) Both (c) and (d)

**71. Choose the correct passive form of the following sentence :**
**He will finish the work in a fortnight.**
(1) The work will be finishing by him in a fortnight.
(2) The work will have been finished by him in a fortnight.
(3) The work will be finished by him in a fortnight.
(4) The work will have finished by him in a fortnight.

**72. Which one of the following sentences expresses a planned action in near future?**
(1) We shall play the match in half an hour.
(2) We shall be playing the match in half an hour
(3) We are playing the match in half an hour.
(4) We will play the match in half an hour.

**73. (a) He has a white stone in his pocket.**
**(b) He can turn into a rabbit.**
**Which one of the following is the correct adjectival clause joining the two sentences above ?**
(1) Which he can turn into a rabbit.
(2) Who can turn into a rabbit.
(3) Whose pocket can turn into a rabbit.
(4) Whose stone can turn into a rabbit.

**74. Match the following:**

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Consensus | (i) | Has the same meaning as 'redundant' |
| (b) | Otiose | (ii) | Opposite can be formed by adding 'dis' |
| (c) | Believe | (iii) | Opposite can be formed by adding 'un' |
| (d) | Acceptable | (iv) | Refers to general agreement |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

**75. 'None of us knew the way'.**
**Which one of the following is a correct sentence with tag-question corresponding to the sentence above?**
(1) None of us knew the way, did we ?
(2) None of us knew the way, didn't we?
(3) None of us knew the way, none of we?
(4) None of us knew the way, didn't us?

**76. Out of the four alternatives choose the one that can be substituted for the given words/sentence as the phrase or group of words. A person who studies the formation of the earth.**
(1) Meteorologist (2) Anthropologist
(3) Geologist (4) Seismologist

**77. "The ship has its complement of 150 passengers".**
**The underlined word in the sentence above means**
(a) praise (b) flattery
(c) full amount (d) supplement
**Answer options :**
(1) (c) only (2) (b) only
(3) (a) only (4) (d) only

**78. Which one of the following sentences is correct in the use of tense referring to habitual action?**
(1) He often went to Shimla to see his parents.
(2) He often goes to Shimla to see his parents.
(3) He has often gone to Shimla to see his parents
(4) He often plans to go to Shimla to see his parents.

the UNIQUE academy

**79. Choose the correct sentences in terms of use of pronouns.**

(a) They them self admitted their guilt.
(b) I will do it ourselves.
(c) The town it selves is not very large.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only
(3) (a) and (c) only (4) None of the above

**80. The accused said, "Sir, I am innocent". Which one of the following sentences changes the sentence above into indirect speech ?**

(1) The accused said that he was innocent.
(2) The accused told that he was innocent.
(3) The accused pleaded that he was innocent.
(4) The accused pleaded not guilty.

**81. Find out the correct idiomatic expression from the given options :**
**Brandy words with.**

(1) argue (2) oratory
(3) speech enthusiast (4) linguistic acumen

**82. Choose the best opposite meaning of PLAUSIBLE.**

(1) Inplausible (2) Implausible
(3) Displausible (4) Feasible

**83. Which of the following contain correctly placed adjective?**

(a) Apparent heir
(b) Time immemorial
(c) Elect viceroy

**Answer options :**

(1) (a) only. (2) (a) and (b) only
(3) (b) only (4) (b) and (c) only

**84. Choose the pair of words that would fill in the blanks in the following sentence sequentially.**

(a) A ..... target is easiest to aim at.
(b) I bought some pencils at the .....

**Answer options :**

(1) stationer's, stationary
(2) stationery, stationary
(3) stationary, stationery
(4) stationary, stationer's

**85. Choose the correct sentences :**

(a) Bread and milk is his only food.
(b) The horse and carriage is at the door.
(c) Every boy and girl was ready.

**Answer options :**

(1) (a) only
(2) (a) and (c) only
(3) (a), (b) and (c)
(4) None of the above

**86. Choose the best meaning of the word printed in capitals in the following sentence :**
**The report OBFUSCATES the principal points.**

(1) Irritate (2) Inspire
(3) Infuse (4) Confuse

**87. Choose the alternative that is the correct equivalent to the following sentence : Lead is the heaviest of all metals**

**Answer options :**

(1) Lead is as heavy as all other metals.
(2) Lead is heavier than all other metals.
(3) Lead is very heavy than all other metals.
(4) None of the above

**88. 'It does not matter whether we win or lose ? Which one of the following sentences changes the sentence above into interrogative ?**

(1) Doesn't it matter whether we win or lose ?
(2) What matters whether we win or lose ?
(3) Does it matter whether we win or lose ?
(4) Does it matter whether we don't win or we don't lose ?

**89. Match the homophones - 'Vein', 'Vain' and 'Vane' with their correct meaning :**

(a) Vein - (i) weathercock
(b) Vain - (ü) blood artery
(c) Vane - (ii) conceited, proud

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (iii) | (ii) |

**90. Identify the sentence containing correctly used article :**

(1) This man is a second Newton.
(2) What kind of a flower is it?
(3) He was a Napoleon of his age.
(4) A falsehood is odious.

**91. Which one of the following correctly explains the word 'homicide' ?**

(a) the act of killing one's family member
(b) the act of killing oneself
(c) the act of killing a human being
(d) the act of killing one's community

**Answer options :**

(1) Both (a) and (d) (2) (c) only
(3) (b) only (4) Both (b) and (d)

**92. 'The regulations apply all office workers.' Which of the following prepositions fills the blank correctly in the sentence above?**

(a) for (b) from
(c) to (d) on

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only
(3) (c) only (4) Both (a) and (d)

**93. Identify correct sentences.**

(a) This boy is strongest than that.
(b) Which of these two pens is the good ?
(c) The Marathas are stronger than the Madrasis

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only
(3) (b) and (c) only. (4) (a), (b) and (c)

**94. Match the following expressions with their meanings :**

| | |
|---|---|
| (a) Blow one's own trumpet | (i) Let secret become known |
| (b) Blow the gaff | (ii) Praise oneself |
| (c) Blow one's top | (iii) To be changeable in opinions |
| (d) Blow hot and cold | (iv) To explode with anger |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

**95. The word "latent" is synonymous with ........ .**

(a) brief (b) later
(c) loose (d) hidden

**Answer options :**

(1) (a) only (2) Both (b) and (c)
(3) (d) only (4) (c) only

**Question numbers 96 to 100 :**

**Read the following passage carefully and answer the questions given below it.**

Building a nation is a very complex, very different task. It requires different kinds of parameters, a different mindset. Building a company is easy. Productivity, efficiency, cost reductions, rules and regulations and so on and you can do it.

Our collective task is very complex. When I say our task, I mean you all need to build a very strong, secular, united nation which gives direction not only to India but to the world. The world is looking and the world is interested in India's development. How do we get everybody to rally? If we can't put our own house in order how do we get everybody to rally? When you look at the media, you feel that everything is falling apart. Morals are going down, work ethics are going bad, and everybody is stealing everything. The rich are becoming richer and the poor are not being paid attention to and it is chaos, confusion and contradictions.

But when you look at the young, at the tools and technology, you see great hope. You feel we can change the face of this country in twenty years, if we just turn it over to the young and that is the requirement of the day.

So when I see these graduate students my message to them is - Build a very strong self. Build a self that is going to serve people. But first you have to serve yourself. If you can't serve yourself, you can't serve anybody. So get a good job, work hard - there is no substitute for hard work. Look beyond your personal interest - to community interests and really create hope.

**96. Everything is <u>falling apart</u>.**
**Select the correct meaning of the underlined.**

(1) moving back (2) disappearing
(3) scattering (4) disintegrating

**97. The speaker expects :**

(a) The students should steal everything from everybody.
(b) The students should develop their personal interest.
(c) The students should keep their houses in a good order.
(d) The students should build such a nation that can give directions to India as well as the world.

**Select the correct alternative.**

(1) Only (a) and (d) (2) Only (b) and (c)
(3) Only (b) (4) Only (d)

**98. Identify the odd pair/s :**

(a) hope - despair
(b) confusion - chaos
(c) collective - individual
(d) contradiction - confirmation

**Answer options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (c)
(3) Only (b). (4) Only (d)

**99. Nation building requires**
**Select the correct alternative to complete the sentence.**

(1) rules and regulations
(2) media and new technology
(3) productivity and luck
(4) new technology and hardworking youth

**100. According to the passage :**

(a) Confusion and contradictions derogate the status of the nation.
(b) Media highlights disintegrating things in society.
(c) Optimistic and hardworking youth is required for nation building.

**Select the correct alternative.**

(1) Only (a) (2) Only (b)
(3) Only (c) (4) All the above

# STI - मुख्य परीक्षा 2015 उत्तरे
## मराठी व इंग्रजी

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 3 | 4 | 4 | 3 | 2 | 2 | 2 | 3 | 2 |
| 11 | # | 2 | 2 | # | 4 | 4 | 1 | 1 | 2 | 4 |
| 21 | 3 | 3 | 3 | 2 | 2 | 4 | 1 | 3 | 2 | 1 |
| 31 | 1 | 1 | 1 | 4 | 3 | 3 | 3 | 4 | 3 | 2 |
| 41 | # | 1 | 1 | 1 | 3 | 4 | 3 | 2 | 1 | 2 |
| 51 | 3 | 2 | 3 | 1 | 1 | 3 | 4 | 2 | 4 | 1 |
| 61 | 2 | 2 | 2 | 4 | # | 4 | 1 | 2 | 3 | 1 |
| 71 | 3 | 3 | 1 | # | 1 | 3 | 1 | # | 4 | # |
| 81 | 1 | 2 | 3 | 4 | 3 | 4 | 2 | 3 | 2 | 1 |
| 91 | 2 | 3 | 2 | 2 | 3 | 4 | 4 | 3 | 4 | 4 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.

The Unique Academy